# वारकरी संप्रदाय दृष्टीक्षेपात मानव जीवन ध्येय

**योगेश अर्जुन सुरळकर**
संशोधक विद्यार्थी
क.ब.चौ.उ.म.वी. जळगांव

**डॉ.जयश्री टी. महाजन**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
मु.जे. महाविद्यालय, जळगाव

**सारंश**

वारी म्हणजे अनन्यसाधारण भक्तिभावाने एकत्र जमलेल्या लोकांची मांदियाळी भारतात आणि महाराष्ट्रात अनेक प्रकारच्या यात्रा आणि पालख्या निघतात तशाच पालख्यांचा एक प्रकार यामध्ये विठ्ठल माऊली च्या दर्शनाच्या ओढीने महाराष्ट्रातील साधारणतः प्रत्येक गावांमधून आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या दिवशी विठ्ठलाच्या दर्शनासाठी गावावरून पालखी घेऊन पायी पंढरपूरला जाणाऱ्या भक्त जनांचा समूह संपूर्ण रस्त्यामध्ये भजन कीर्तन आणि हरिनामाने तल्लीन होऊन विठ्ठलाच्या दर्शनाने यात्रेचे सम आपण केले जाते अशा यात्रांमध्ये सहभागी होत अध्यात्मिक आणि सांसारिक जीवन जगणाऱ्या भक्तांचा समूह म्हणजेच वारी आणि या वारीतील प्रत्येक सहभागी जण याला वारकरी असे संबोधले जाते या वारकऱ्यांच्या संप्रदायाला साधारणतः सहाशे ते आठशे वर्षांचा इतिहास आणि परंपरा आहे या संप्रदायात जीवन मूल्य आणि मानव मूल्य या सर्वांना विशिष्ट ध्येयाने रोजच्या नित्य जीवनात आणून हा संपूर्ण वारकरी संप्रदाय आपले जीवन व्यतीत करत असतो

महत्व पुर्ण शब्द : - मोक्ष, चिकित्सक ,वारी, धर्म, अर्थ, काम व मोक्ष, पुरुषार्थ

**प्रस्तावना:**

संपूर्ण पृथ्वीतलावर केवळ मानव हा एकमेव असा प्राणी आहे कि तो निसर्गाला पूर्णपणे शरण गेला नाही. आपल्या सभोवताली घडणारी कोणतीही घटना असो, मग अगदी पाऊस पडण्यापासून ते सोसाटाने वाहणाऱ्या वाऱ्या पर्यन्त. या सर्व क्रियांचा पडद्याआड कोणती शक्ती कार्य करते ? आणि या घटनांचा क्रम कोणता ? तसेच या घटनांची कारणे मनुष्याने शोधण्याचा प्रयत्न केला. यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करू लागला. या दृष्य जगतात दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल, मग ग्रह असतील, वृक्ष असतील, समुद्र असेल किंवा आकाश, अशा इतरही अनेक गोष्टी यांची तो चिकित्सा करू लागला. यातून मिळणाऱ्या तथ्यांचा तो क्रम ठरवून त्यात सुसंगतीचा मेळ बसवू लागला. आणि या त्याच्या अभ्यासातूनच विज्ञान जन्माला आले. मानवाची ही ज्ञान मिळवण्याची पद्धत म्हणजे विज्ञान होय. अशा प्रकारे मानवाच्या जिज्ञासेपोटी अनेक शास्त्रे जन्माला आली. मानवाच्या या जिज्ञासेमुळेच आजवरची शास्त्रे प्रगत झालेली दिसतात. समाजशास्त्राच्या मते चिकित्सक दृष्टीने मिळवलेल्या ज्ञानाची जी व्यवस्थित, सुसंगत, सूत्रबद्ध व परस्परावलंबी रचना असते यालाच शास्त्रशुद्ध असणे फार महत्त्वाचे असते. शास्त्रीय विचार पद्धतीमध्ये आपण मांडलेल्या सिद्धांतामध्ये क्रम व सुसंगतपणा असणे आवश्यक असते.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनाप्रमाणेच अध्यात्मिक दृष्टीकोनातून सुद्धा मनुष्य जीवन उन्नत व विकसित झाले पाहीजे. अन्यथा तो लौकिक दृष्ट्या जरी विकसित दिसत असला तरी त्याचे आंतरिक स्थिती मात्र अशांतच असणार. कारण जोपर्यंत धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ जो पर्यत मनुष्य साध्य करत नाही तोपर्यंत मनुष्याला शांती मिळणार

नाही. या चार पुरुषार्थांपाकी अर्थ व काम हे दोन पुरुषार्थ केवळ लौकिक आहेत. उर्वरित दोन हे अध्यात्मिक होत. तसे पाहता मनुष्य लौकिक जीवनात सुद्धा धर्माचे पालन करू शकतो. परंतु ते प्रत्येकालाच साध्य होईल यात शंका आहे. परंतु मोक्ष केवळ अध्यात्मिक ज्ञानाशिवाय, भक्तीशिवाय अशक्य आहे. परंतु वारकरी संप्रदाय संत मोक्षापिक्षाही भक्तीला अधिक महत्व देतात. परमात्याची भक्ती करण्यात जो आनंद आहे, तो कदाचित मोक्षात नसावा. आणि म्हणून संप्रदायामध्ये भक्तीला पाचवा पुरुषार्थ मानतात.

**मानव** : सृष्टीमध्ये मानवाप्रमाणेच अनेक प्राणी आहेत. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. मानव हा त्यांच्यापेक्षा वेगळा आहे. इतर प्राण्यांप्रमाणेच त्यांच्यात सुद्धा काही साम्य गुणधर्म आहेत, जसे भय, मैथुन, आहार व निद्रा. मानवाची शरीररचना सुद्धा इतर प्राण्यांपासून वेगळी आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे दोन गोष्टी मनुष्याला इतर प्राण्यांपासून वेगळे करतात, त्या म्हणजे त्याची विचार करण्याची क्षमता आणि विचार प्रकट करण्याची शक्ती म्हणजे त्याची बोलण्याची शक्ती. मेंदू इतरही प्राण्यांमध्ये आहे, परंतु स्वतःच्या हिताचा विचार केवळ मनुष्य करू शकतो. तसेच काही अभ्यासकांच्या मते, ज्याला मन असते त्याला मनुष्य म्हणतात. परंतु अध्यात्मिक दृष्टीने विचार केल्यास मनुष्य हा परमात्म्याचा अंश आहे. ब्राम्हंडातील प्रत्येक कणात परमात्म शक्ती कार्यरत असते. विश्वातील प्रत्येक कणात परमात्मा आहेच. परंतु मनुष्य हा परमेश्वराची विशेष कलाकृती आहे. कारण मनुष्य हा परमात्मा व पशु यांच्यातील दुवा आहे. पाहीजे तर तो पशु सुद्धा होवू शकतो, पाहीजे तर परमात्मा सुद्धा. कारण परमात्म्याने त्याला विशेष शक्ती देवून विशेष कार्यासाठी निर्मित केले आहे. आणि ते म्हणजे मनुष्याने लौकिक गोष्टींचा नव्हे तर स्वतःचा शोध घेण्यासाठी. कारण केवळ ही एकच गोष्ट अशी आहे टी केवळ मनुष्यच करू शकतो. त्यासाठी त्याला धर्म आणि मोक्ष या पुरुषार्थांची साधना करावी लागते.

धर्म म्हणजे नीती, धर्म म्हणजे सत्य, धर्म म्हणजेच परमात्मा आणि त्या स्थितीमध्ये आपले समर्पण म्हणजे मोक्ष, मुक्ती होय. वारकरी संप्रदाय मनुष्याला जीव असे संबोधतो. त्या जीवाचे शिवासोवत म्हणजे परमात्म्यासोबत मिलन हेच मनुष्य जीवनाचे ध्येय असे वारकरी संप्रदाय मानतो. श्रीमद्भगवद्गीतेमध्ये शरीराला क्षेत्र व त्या शरीराला जाणणारा त्याला क्षेत्रज्ञ असे म्हटले आहे. या सृष्टीतील सर्वात श्रेष्ठ जीव म्हणजे मनुष्य प्राणी होय.

**समाज** : मनुष्य ज्या परिवेशात राहत असतो त्याला समाज असे म्हणतात. मुळात मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. सामाजशात्रामध्ये सामाजिक व्यवस्थेला समाज अशी व्याख्या आहे. काही अभ्यासक विशिष्ट समूहांना समाज असे म्हणतात. मनुष्याच्या विविध क्रिया व क्रियेंच्या संबंधातून व त्याचा त्याच्यावर पडणाऱ्या प्रभावातून समाजनिर्मिती होत असते. समाज हा मनुष्याच्या अंतरबाह्य क्रियांच्या संबंधातून निर्मित होत असतो. त्याने आत्मसात केलेले ज्ञान व त्या ज्ञानाचा उपयोग करून, त्याच्या आचरणातून समाजाचा विकास होत असतो. तो आपल्या पूर्वजांचे जे अनुकरण करतो त्याला संस्कृती असे म्हणतात. या संस्कृतीच्या अभ्यासातून अनेक संस्था निर्माण होत असतात, ज्या समाजाला पूरक असतात. संस्कृतीमुळे समाज टिकून राहण्यास मदत होत असते. मनुष्याशिवाय समाज या संज्ञेस अर्थ उरत नाही. कारण मानव-मानवातील संबंधावरचा समाज निर्मित होत असतो. मानवच नसेल तर समाज ही संज्ञा पूर्णपणे संपुष्टात येईल. आणि म्हणून वारकरी संप्रदायाने समाज म्हणजे एखादा विशिष्ट समूहाला संबोधले नसून संपूर्ण मानव जातीला समाज ही उपाधी दिलेली आहे. व वारकरी संप्रदायाची तत्वे, प्रार्थना व सिद्धांत सुद्धा संपूर्ण मानव समाजाच्या हितासाठी आहेत.

**वारकरी संप्रदाय तत्वज्ञान आणि परमात्मा** : परमात्म्याची कोणत्याच शब्दांनी व्याख्या करता येणे शक्य नाही. कारण व्याख्या केली म्हणजे ती गोष्ट, वस्तू त्या शब्दांच्या मर्यादेत, कसोटीत बंदिस्त होत असते. परंतु परमात्मा अमर्याद, अव्यक्त,

अविनाशी, अजन्मा, अनंत, आनंदमय, सत्य, स्थिर, चैतन्यस्वरूप आणि स्वयंसिद्ध आहे. तो या विश्वाचा निर्माता आहे. तो सर्वदेशीय आहे. पूर्णस्वरूप आहे. काही अभ्यासक ईश्वराचे अस्तित्व मानायला तयार नाहीत, परंतु कोणी सूर्याला सूर्य मानायला तयार नसतील तर त्याचा सूर्यावर किंवा सूर्याला मानणार्यांवर काहीही फरक पडत नाही. परंतु काही अभ्यासक हे सुद्धा मानतात की ज्या विज्ञानाला मनुष्य मेल्यावर जातो कुठे ? किंवा जन्मापूर्वी त्याची काय अवस्था असते ? किंवा या विश्वातील एक अणुदेखील विज्ञान निर्मित करू शकत नाही. या विश्वात काहीही निर्माण करता येत नाही, किंवा काही नष्टही करता येत नाही हे विज्ञानाला मान्य आहे, तर मग या संपूर्ण विश्वाचा नियंता कोणीतरी असायला हवाच नं ! त्या शक्तिलाच आध्यात्म परमात्मा म्हणते. परंतु अर्धा पाण्याने भरलेला मानायला तयारच नसतात, तसा हा वाद आहे.

परमात्मा हा तर्काच्या पलीकडे असल्यामुळे त्याला तर्काने सिद्ध करता येणे कदापि शक्य नाही. कारण आस्तिकांनी कितीही तर्क दिले तरी नास्तिक त्याचं खंडन करतीलच. आणि अस्तिकांना कितीही तर्क दिले किंवा कितीही पुरावे दिले तरी ते मुलाने बापाच्या जन्माचे पुरावे देण्यासारखे आहे. जर परमात्मा स्वतंत्र, स्वयंभू आहे तर मग त्याचे अस्तित्व सुद्धा स्वयंभूच असायला पाहीजे. त्यास्तव तो आहे किंवा नाही ही सिद्ध करण्याची गोष्टच मुळात होत नाही. तो केवळ एक निष्फळ वाद म्हणावा लागेल.

वारकरी संप्रदाय त्या शक्तीला सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही स्वरुपात मानतांना दिसतो. विश्वनियंत्या त्या शक्तीला एका विशिष्ट पात्रामध्येबसवून त्याला संप्रदाय परमात्मा मानतो. या ब्राम्हंडातील प्रचंड शक्ती ह्या एकमेकांशी संबधित सुद्धा आहेत व एकमेकांशी पूरक सुद्धा आहेत. सूर्याने आपले एक मीटर जरी पृथ्वीसोबतचे अंतर कमी केले, तर कमी तापामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टी नष्ट होईल. आणि एक मीटर जरी वाढवले तर शीतप्रलयाने जीवसृष्टी नष्ट होईल. चंद्राच्या कलांमुळे समुद्राची भरती ओहटी, आकाशातील ढगाळ वातावरणाचा मनुष्याच्या आरोग्यावर होणारा परिणाम या सर्व गोष्टी एका धाग्यामध्ये आपोआप गुंफू शकत नाही. यासर्व शक्तीवर कोणाचे तरी नियंत्रण असायला हवे. आणि या सर्व शक्तींचा जन्मदाता, आश्रय, व्यवस्थापक म्हणजे परमेश्वर असे वारकरी संप्रदाय मानतो. यासर्व गोष्टीचा एकच आश्रय असायला हवा कारण या ब्राम्हंडातील प्रत्येक कण एकमेकांसोबत क्रियाप्रतीक्रिया करत आहे. त्यांचे निर्माते त्यांचे व्यवस्थापक वेगवेगळे असते. तर त्यांच्यामध्ये संतुलन साधने शक्य झाले नसते.

मानवी शरीरातील प्रत्येक अवयव हा एकमेकांसोबतक्रियाप्रतीक्रिया करत असतो. त्यातला एक जरी क्षतिग्रस्त झाला तर त्याचा परिणाम संपूर्ण शरीरावर होत असतो. शरीरामध्ये संतुलन नसेल तर आरोग्य अशक्य आहे. मग प्रचंड अशा विश्वामध्ये हि महाकाय व्यवस्था जडाच्या माध्यमातून होणे कसे शक्य आहे ? आणि म्हणून, या विश्वात होणारी लहानातील लहान व मोठ्यातीला मोठी क्रिया जसे सूर्याचे चालणे किंवा वृक्षाच्या पानाचे हलणे सुद्धा परमात्म सत्तेशिवाय नाही, असे वारकरी संप्रदायाचे मात आहे. काही लोक त्याला परमेश्वर म्हणत असतील तर काही त्याला ईश्वर, ब्रम्ह, परब्रम्ह म्हणत असतील. वेद त्याला आत्मा म्हणतो.

वारकरी संप्रदाय हे मनुष्याला परमेश्वराचा अंश मानतो. परंतु प्रत्येक मनुष्य जीव हा कर्म करण्यास स्वतंत्र असल्यामुळे माणसामाणसात कर्मभेद दिसत असतो. कारण प्रत्येक मनुष्यामध्ये जरी एकच परमात्मा विराजमान असला तरी प्रत्येकाला कर्म करण्याचे स्वातंत्र्य आहे. उदा. जसे एकच वीज वीजेचा बल्ब, रेफ्रिजरेटर व कुलर मध्ये कार्य करत असते. परंतु प्रत्येकाचे कर्म स्वतंत्र असल्याने वीज जरी एक असली, तरी हिटर पाणी गरम करते, तर कुलर पाणी थंड करते. म्हणूनच मनुष्य आपली आत्मोन्नती साधण्यास पात्र नक्की आहे परंतु प्रयत्न करणे हे त्याच्या स्वतःवर अवलंबून असते. जीवनाचे ध्येय परमात्मा प्राप्ती जरी असले, तरी परमात्म प्राप्ती कारणे किंवा न कारणे हे सर्वस्वी ज्याचे त्याचेवर अवलंबून

आहे. भक्ती करायची कि चोरी, हे मनुष्याचे स्वातंत्र्यआहे. वास्तविक पाहता परमात्मा प्राप्ती हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी भक्ती करावीच लागेल. कारण, भक्तीमध्ये जे सुख आहे ते परमात्माप्राप्तीपेक्षाही श्रेष्ठ आहे, आही म्हणून वारकरी संत देवाला उद्देशून म्हणतात की तुझ्यापेक्षाही तुझी भक्ती तुझे नाम श्रेष्ठ आहे. वारकरी संप्रदाय संत ज्ञानेश्वर हे योग मार्गाचे जाणकार होते. तरी त्यांनी योगाला निकृष्ट ठरवीत भक्तीला श्रेष्ठत्व दिलेले दिसते. श्रीमद्भागवत महापुराण सुद्धा भाक्तीलाच श्रेष्ठ मानते. कारण भक्तीचे सुख स्वताः भगवंताला सुद्धा घेता येत नाही. वारकरी संप्रदाय संत चारही पुरुषार्थ बाजूंला सारून पंचम पुरुषार्थ भक्तीला मानतात.

परमात्मा प्राप्तीसाठी केलेली भक्ती म्हणजे बाह्य आवडंबर नसून तो आंतरिक स्थिती आहे, मानसिकता आहे, भक्ती एक अवस्था आहे. नव्हे नव्हे ती एक वृत्तीच आहे. आता ती भक्ती प्राप्त करण्यासाठी काय करायचे हा प्रवास सुरु होतो. काय करावे ? काय करू नये ? काय खावे? काय खावू नये ? मनुष्याचा नेमका आचार काय असावा ? येथूनच साधकाचा खरा प्रवास सुरु होतो.

**मानवी जीवनाचे साफल्य** : मनुष्याला त्याच्या जीवनाचे ध्येय एकदा का समजले म्हणजे त्याचा योग्य प्रवास सुरु होतो. वारकरी संप्रदाय मताप्रमाणे परमात्मा प्राप्ती, जिवाशिवाचे मिलन हे मानवी जीवनाचे ध्येय आहे. वारकरी संप्रदाय गीतातत्वानुसार आत्म्याला अमर मानतो, तर शरीराला नश्वर. प्रत्येक मनुष्यात आत्मा आहेच आणि तोच परमात्मा आहे, हे सत्यच आहे. परंतु प्रत्येक जीवाला याचे ज्ञान नसते. यालाच जीवाचे अज्ञान म्हणतात. आपल्याला स्वः चा विसर पडणे म्हणजे अज्ञान. आपण नश्वर देह नसून अमर आत्मा आहोत या गोष्टींचा मनुष्याला पडलेला विसर हीच माया, हीच भ्रांती आणि या भ्रांतीमुळे तो शरीर व शरीरसंबंधांनाच आपले समजून त्यातच आपले जीवन व्यतीत करत असतो. आणि लौकिक जीवनामध्ये त्याला आत्मसाक्षात्काराचा पूर्णपणे विसर पडतो. खरे पाहता परमानंदाची प्राप्ती हे त्याच्या जीवनाचे ध्येय आहे. परंतु ध्येयाचा विसर पडल्यामुळे तो मायेच्या आधीन होतो जीवन-मृत्यू यांच्या फेऱ्यात अडकतो. त्याचे ध्येय आपल्या स्वरूपाचा शोध घेणे म्हणजे, मी कोण ? याचा शोध घेण्याऐवजी त्या परमात्मा सुख ऐवजी पैसा कामाविण्यामध्ये, प्रतिष्ठे मध्ये विषयभोगांमध्ये परमात्मा सुखाचा शोध घेण्याचा प्रयत्न मनुष्य करत असतो. लौकिक गोष्टींमध्ये तो सुख समजतो. मग तो त्याचे खरे ध्येय जे पारलौकिक सुख, त्याला मात्र मुकतो. हीच ती माया. ती तरुन जाने फार अवघड आहे. एकदा का मनुष्य जीव या मायेच्या चक्रात अडकला, मग मात्र त्याला बाहेर पडणे कठीण होऊन बसते. मग त्याला काय करावे ? काय करू नये ? आपल्यासाठी योग्य काय ? अयोग्य काय ? काही कळत नाही. ते कोणाला कळत असेल तर ते संतांना कळत असत. कारण संत हे विवेकी असतात. जीवाला आत्मविस्मृती झालेली असते व ते स्मरण करून द्यायचे काम संत करत असतात.

भक्ती कशी करावी ? देवाची पूजा कशी करावी ? हे सांगणारे समाजात अनेक प्रकारे पंथ, अनेक प्रकारचे पंथ, अनेक प्रकारचे आश्रम, अनेकानेक विचार प्रवाह दिसतात. तेव्हा नेमके आपण काय करावे, हे सामान्य मनुष्याला कळणे अवघड होऊन बसते. काहींची तर सुरुवात येथून असते की देवाला अगरबत्त्या किती लावाव्यात ? कोणत्या दिशेला बसून देवाची पूजा केली पाहीजे ? निरंजानामध्ये किती वाती असाव्यात ? निरंजानामध्ये तेल चालेल की तूपच पाहीजे ? मग ते म्हशीचे चालेल की गाईचेच पाहीजे ? असे एक नं अनेक प्रश्न सामान्य मनुष्याला पडतात. परंतु वारकरी संतांना हे सर्व काहीही अपेक्षित नाही. वारकरी संत म्हणतात देवाला मानसपूजाच ज्यास्त आवडते. कारण जर तो सर्वव्यापी असेल तर आपल्यात सुद्धा तो आहेच. आणि जर तो आपल्या अंत:करणात असेल तर मग त्याला आपण केलेली मानसपूजा कळायलाच पाहीजे. नाहीतरी भक्तीचे आवडंबर केले तरी जोपर्यंत साधकामध्ये आंतरिक बदल होत नाही तो पर्यत केलेले

कर्म हे भक्ती होऊच शकत नाही. लौकिक दृष्टीने जरी ते पारमार्थिक कर्म वाटत असेल.तरी ते फलद्रूप होणे शक्य नाही. कारण देवाला सर्वच्या अंतकरणातीलकळत असते. म्हणून मनुष्याने बाह्य आवडंबर करून समाजाला, इतरांना कितीही फसविले, तरी आत असणाऱ्या त्या शक्तीला मनुष्य फसवू शकत नाही. आणि केवळ देवाची भक्ती भजनच मनुष्याला या संसारसमुद्रातून पार नेण्यात समर्थ आहे, दुसरा मार्गाच नाही. वारकरी संप्रदायाचे हे तत्वज्ञान संतांनी संपूर्ण जगासाठी खुले केलेले आहे. आपण जिथे आहोत तिथे भक्ती करू शकतो. देवाला पान, फुल, पाणी भक्तिभावाने काहीही अर्पण केले तरी चालते. कारण त्याच्या प्राप्तीला पैसा वैगरे काहीही मोल लागत नाही लागतो तो केवळ भाव.

**निष्कर्ष** : सत्याचा शोध घेणे, परमात्मा प्राप्ती कारणे, धर्माधिष्टीत जीवन जगणे या सर्व गोष्टी एकच अर्थाने आहेत. संत तत्वदर्शी महात्मा होते. त्यांनी सत्य जाणले होते. त्यांना परमात्म तत्वाचा साक्षात्कार झाला होता. कारण ज्यांचे जीवन धर्मयुक्त होते. त्यांच्या जीवनाला तात्विक बैठक होती. ते जे वागले तोच नियम व ते ज्या मार्गाने गेले तेच सत्य, असा वारकरी संप्रदायाचा विश्वास आहे. वारकरी होणे, भक्त होणे एक अवस्था आहे. जोपर्यंत साधक सिद्धीवस्थेपर्यन्त पोहोचत नाही तोपर्यंत तो विषयांचा त्याग करूच शकत नाही. आणि तो त्याने करुही नये. कारण बाह्य अंगाने जरी त्याने अशी घोषणा केली, की मी विषयांचा त्याग केला आहे. आणि आतून जर विषयांचे चिंतन चालू असेल, तर तो स्वताःच स्वताःची व समाजाची सुद्धा नव साधकाला त्यागासारखेच फल देणारे आहे. असेच शास्त्र मत सुद्धा आहे. कारण त्यामुळे समाजात स्थैर्य टिकून राहत असते. मनुष्य जर कोणतेही नियमाशिवाय विषयांचे सेवन करू लागला तर मग मनुष्य व पशु यात फरक तरी काय ? म्हणून शास्त्रांनेच मनुष्याला विधीपूर्वक विषयांचे सेवन करण्यास संमती दिलेली आहे. जेणे करून समाजात अस्थिरता येणार नाही. मग तो जर का विधीपूर्वक विषय सेवन करीत भक्ती करील, तर मात्र त्याला भक्तीची आवड निर्माण होण्यास मदत होते व हा मनुष्यासाठी खरा लाभ आहे सगुण

**संदर्भ सुची -:**


1) भा. प. बहिरट , प.ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास 1988, व्हीनस प्रकाशन पुणे.
2) डॉ. सदानंद मोरे, तुकाराम दर्शन 1996, गाज प्रकाशन पुणे.
3) म.बा.कुंडले, शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र 2003, श्रीविद्या प्रकाशन पुणे.
4) डॉ. गोपाळराव गोविंद बेणारे, सार्थ श्रीतुकारामाची गाथा, शारदा साहित्य पुणे.
5) श्रीबाबाजीमहाराज पंडित यांनी विवरण केलेली श्रीज्ञानेश्वरी-गुढार्थदीपिका, गीताप्रेस गोरखपूर.
6) डॉ. नरेंद्र दाभोळकर तिमिरातुनी तेजाकडे 2013, राजहंस प्रकाशन पुणे.
7) आचार्य रजनीश (ओशो), गीता दर्शन, ताओ पब्लिशिंग प्रा. लि. कोरेगाव पार्क पुणे.
8) डॉ. गोपाळराव गोविंद बेणारे, सार्थ श्रीतुकारामाची गाथा, शारदा साहित्य पुणे.
9) गीताप्रेस गोरखपूर, नामदेवांची गाथा.
10)स्वामी रामसुखादास, श्रीमद्भागवदगीता साधक – संजीवनी, गीताप्रेस गोरखपूर.